# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- २६/११/२०२२ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (Heading) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २६.११.२०२२ | पुण्यनगरी पु. पा. ०४ | भवनविरोधात मराठी एकीकरण समितीचे उपोषण | मिरा-भाईंदर | |
| २. | २६.११.२०२२ | पुण्यनगरी पु. पा. ०४ | कंत्राटी कामगारांच्या मागण्यांसाठी मनसेचा महापालिकेवर मोर्चा | मिरा-भाईंदर | |
| ३. | २६.११.२०२२ | पुण्यनगरी पा. ०२ | वसई न्यायालय परिसरातून आरोपीचे पलायन | विरार | |
| ४. | २६.११.२०२२ | लोकमत पा. नं. ०१ | "एम्स" वर सायबर हल्ला | इतर | |
| ५. | २६.११.२०२२ | लोकमत पा. नं. ०४ | मृत्युप्रकरणी गुन्हा दाखल | वालीव | |
| ६. | २६.११.२०२२ | लोकमत पा. नं. ०४ | विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार | नालासोपारा | |
| ७. | २६.११.२०२२ | लोकमत पा. नं. ०४ | भाईंदर खाडीतील शोधमोहीम थंडावली | माणिकपूर | |
| ८. | २६.११.२०२२ | लोकमत पा. नं. ०४ | श्रध्दाच्या कॉलेजच्या मित्राची चौकशी | माणिकपूर | |
| ९. | २६.११.२०२२ | लोकमत पा. नं. ०४ | श्रध्दाच्या दातांचा एक्स-रे ठरणार दुवा | माणिकपूर | |
| १०. | २६.११.२०२२ | लोकसत्ता पा. नं. १६ | दिड हजार किलो प्लास्टिक जप्त | वसई-विरार | |
| ११. | २६.११.२०२२ | लोकसत्ता पा. नं. १६ | "बायोमेट्रिक" नसल्यामुळे कामचुकारपणात वाढ | वसई-विरार | |
| १२. | २६.११.२०२२ | लोकसत्ता पा. नं. १७ | कायदेशीर भाडे १५ रुपये वसुली २० रुपयांची | वसई-विरार | |
| १३. | २६.११.२०२२ | लोकसत्ता पा. नं. १७ | ३५ हजार चौरस फुटांचे बेकायदा बांधकाम पालिकेकुडन जमीनदोस्त | वसई-विरार | |
| १४. | २६.११.२०२२ | म.टा. पु. पा. ०१ | पदाधिकाऱ्यांच्या हकालपट्टी | मिरा-भाईंदर | |
| १५. | २६.११.२०२२ | म.टा. पु. पा. ०१ | रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्यांवर बडगा | वसई-विरार | |
| १६. | २६.११.२०२२ | सामना पा. नं. ०७ | विजेचा झटका | वसई-विरार | |
| १७. | २६.११.२०२२ | सामना पा. नं. ०७ | तरुण जखमी | वसई-विरार | |
| १८. | २६.११.२०२२ | सामना पा. नं. ०७ | ठेकेदारांवर गुन्हे | अर्नाळा | |
| १९. | २६.११.२०२२ | सामना पा. नं. ०७ | गांजा जप्त | आचोळे | |
| २०. | २६.११.२०२२ | पुढारी पा. नं. ०२ | खाजगी क्लासच्या शिक्षकाचा विद्यार्थिवर अत्याचार | नालासोपरा | |

CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१. | २६.११.२०२२ | पुढारी पा. नं. ०७ | भारत जोडो यात्रेत बॉम्बस्फोटाची धमकी देणाऱ्यास अटक | इतर | |
| २२. | २६.११.२०२२ | पुढारी पा. नं. ०२ | महिलांनी काही नाही घातले तरी छानच दिसतात | इतर | |
| २३. | २६.११.२०२२ | पुढारी पु. पा. नं. ०२ | मिरा-भाईंदरमध्ये ड्रोन उडवण्यास बंदी | मिरा-भाईंदर | |
| २४. | २६.११.२०२२ | पुढारी पु. पा. नं. ०३ | दारु घ्या आणि कुठल्याही हॉटेलात बसा | मिरा-भाईंदर | |

CamScanner

पुण्य नगरी पु पा. नं. ४

# कंत्राटी कामगारांच्या मागण्यांसाठी मनसेचा महापालिकेवर मोर्चा

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिकेत कार्यरत असलेल्या कंत्राटी सफाई कामगारांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यांच्या अनेक मागण्या काही वर्षांपासून प्रलंबित आहेत. या मागण्या पूर्ण करण्यासाठी मनसेने म्युनिसिपल कामगार सेनेचे अध्यक्ष संदीप देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली महापालिका मुख्यालयावर मोर्चा काढला. त्यावेळी मनसेने कामगारांच्या प्रलंबित मागण्या ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण केल्या नाहीत तर आयुक्तांना पालिका मुख्यालयात प्रवेश बंदी घालू, असा इशारा दिला आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेत कार्यरत असलेल्या काही कंत्राटी सफाई कामगारांचे नेतृत्व मनसेकडून केले जात आहे. ठेकेदार या कामगारांना कमी वेतन देत असून तेही रोखीने देत आहेत. देण्यात येणारे वेतन प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत न देता २० तारखेनंतर दिले जाते. त्यामुळे कामगारांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे कामगारांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेलाच वेतन त्यांच्या बँक खात्यात जमा करावे. कामगारांनी कोरोना काळात जीवाची पर्वा करता रात्रंदिवस काम केले. त्यांना मुंबई महापालिकेच्या



धर्तीवर कोरोना काळातील भत्ता देण्यात आलेला नाही, तो तत्काळ देण्यात यावा. रविवार व सणांच्या सुट्ट्या मिळाव्यात, एका वर्षात २ वेळा पूर्ण गणवेश देण्यात यावा, काही कामगार ग्रॅच्युइटी पात्र असूनही त्यांना ग्रॅच्युइटी देण्यात येत नाही. त्यांना ग्रॅच्युइटी तत्काळ देण्यात यावी, ज्या कामगारांचा पगार रोख होत असतील अशा सर्व कामगारांचा पीएफ व ईएसआयसी भरून कामगारांचा पगार बँकेत जमा करण्यात यावा, कामगारांना साफसफाई करता चांगल्या दर्जाचे साहित्य देण्यात यावे, पावसाळी रेनकोट, सॅन्डल व हिवाळी स्वेटर, कानटोपी, मोजे देण्यात यावेत, सर्व कामगारांना आरोग्य केंद्र सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. त्याच बरोबर महानगरपालिकेत होणाऱ्या भरतीमध्ये पहिले प्राधान्य स्थानिक लोकांना देण्यात यावे, अशी मागणी मनसेकडून करण्यात आली आहे. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे यांच्यासह उपायुक्त रवी पवार यांनी मनसेच्या शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलावून त्यांना ३१ जानेवारीपर्यंत कामगारांच्या प्रलंबित मागण्यांवर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. त्याला मान्य करत ३१ जानेवारीपर्यंत मागण्या मान्य न झाल्यास आयुक्त दिलीप ढोले यांना घेराव घालून पालिका मुख्यालयात प्रवेश बंदी करू, असा इशारा मनसेकडून देण्यात आला आहे. यावेळी महापालिका कामगार कर्मचारी सेना अध्यक्ष संदीप देशपांडे, शहर अध्यक्ष हेमंत सावंत, उपशहर अध्यक्ष सचिन पोपळे व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CamScanner

लोकमत पा. न. १

# 'एम्स'वर सायबर हल्ला

## वैद्यकीय क्षेत्रात आजवरची सर्वांत मोठी हॅकिंग

**४ कोटी** रुग्णांचा डेटा चोरीला | ३ दिवसांपासून ऑनलाइन काम बंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशातील सर्वांत महत्त्वाचे वैद्यकीय केंद्र ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसचे (एम्स) सर्व्हर हॅक करून सायबर गुन्हेगारांनी चार कोटी रुग्णांचा डेटा चोरला आहे. गेल्या १५ दिवसांपासून संस्थेचे काम जवळपास ठप्प झाले आहे. बहुतांश विभाग मोबाइल फोनच्या डेटाने संगणक चालवीत आहेत. देशातील वैद्यकीय क्षेत्रातील आतापर्यंतची ही सर्वांत मोठी हॅकिंग मानली जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यामध्ये चीनशी संबंधित हॅकर्सचा हात असल्याचे सांगण्यात येत आहे.

यासंदर्भात आतापर्यंत कोणत्याही सरकारी यंत्रणेकडून अधिकृत माहिती जारी करण्यात आली नसली तरी, गुन्हेगारांनी डेटा परत करण्यासाठी मोठ्या रकमेची मागणी केल्याचे मानले जात आहे. एम्सच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी रात्री उशिरा याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार नोंदवली आहे.

माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाव्यतिरिक्त राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित इतर एजन्सी एम्सच्या यंत्रणेचे रक्षण करण्यात गुंतलेल्या आहेत. माहिती विभाग आणि राष्ट्रीय तंत्रज्ञान संशोधन संस्थेचे सायबर सुरक्षा पथक या घटनेच्या तपासात गुंतले आहे. दिल्ली पोलिसांच्या गुप्तवार्ता विभागाने याप्रकरणी गुन्हा नोंदवला आहे.




### डेटा परत मिळविण्याचा प्रयत्न

कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम ऑफ इंडिया आणि राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र दिल्ली पोलिसांच्या विशेष सेलला एम्स डेटा पुन्हा मिळविण्यासाठी मदत करीत आहे. हल्ला कोणत्या तरी व्यक्तीच्या मेलमध्ये पाठवलेल्या कोड मेसेजद्वारे करण्यात आला आहे. त्यामुळे आता संस्था त्यांच्या कोणत्याही फाइल्स आणि डेटामध्ये प्रवेश करू शकत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

### कामकाज पूर्णपणे विस्कळीत

एम्सच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार बुधवारी संध्याकाळी सुरक्षेच्या कारणास्तव एम्स लॅन इंटरनेट सर्व्हरही बंद करावे लागले. त्यामुळे ओपीडीचे काम ठप्प झाले आहे. रुग्णालयाला रुग्णांचे प्रयोगशाळा अहवाल, रुग्णाचा खर्च हा डेटाही मिळू शकत नाही. सध्या एम्स कॅम्पसमध्ये मोबाइल इंटरनेट सेवा वापरली जात आहे.

### राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी घेतला आढावा

**१** या प्रकरणाचे गांभीर्य पाहून राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी गुरुवारी सायंकाळी उशिरा एम्सला भेट दिली आणि डेटा चोरीच्या प्रकरणात राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित बाबींचा आढावा घेतला. केंद्र सरकारने देशातील सर्व प्रतिष्ठित संस्थांना फायरवॉल मजबूत करण्याच्या सूचना दिल्या आहेत, तसेच सर्व कर्मचाऱ्यांना अधिकृत संगणकावर वैयक्तिक ई-मेल वापरू नका, असे आदेश दिले आहेत.

### दिग्गजांचा डेटाही गेला?

**२** 'एम्स'चा डेटा आठ वर्षांपूर्वी पूर्णपणे डिजिटल करण्यात आला होता. त्यानंतर अटल बिहारी वाजपेयींसह अनेक माजी पंतप्रधान, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आदी मान्यवरांवर एम्समध्ये उपचार करण्यात आले आहेत. या सर्वांचा वैयक्तिक डेटा एम्सच्या सर्व्हरवरून चोरीला गेला असण्याची शक्यता आहे.

### पेपरलेस मोहिमेला झटका

**३** एम्सने एक महिन्यापूर्वीच १ जानेवारी २०२३ पासून रुग्णालयाचे कामकाज पेपरलेस होईल आणि एप्रिल २०२३ पासून ते पूर्णपणे डिजिटल होईल, अशी घोषणा केली होती. दुसरीकडे, केंद्र सरकारने डिजिटल हेल्थ कार्ड बनवून देशातील सर्व लोकांच्या आरोग्याशी संबंधित सर्व माहिती नॅशनल डेटा बँकेत ठेवण्याची तयारी केली आहे. हा सायबर हल्ला या मोहिमांना मोठा धक्का मानला जात आहे.

लोकमत पा. न. ४

## मृत्युप्रकरणी गुन्हा दाखल

**नालासोपारा :** वसईच्या धुमाळ नगर येथे तेराव्या मजल्यावरून पडून कामगाराच्या झालेल्या मृत्युप्रकरणी वालीव पोलिस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इमारतीवर काम करताना ओमकार वर्मा (वय ३६) या कामगाराचा २१ नोव्हेंबरला संध्याकाळी तेराव्या मजल्यावरून खाली पडल्याने मृत्यू झाला होता. कामगाराला सुरक्षिततेच्या सोयी सुविधा उपलब्ध करून न देता त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी कॉन्ट्रॅक्टर जिशान कुरेशी व लेबर कॉन्ट्रॅक्टर जगदंबा वर्मा या दोनजणांविरोधात गुरुवारी वालीव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकमत पा. न. ४

## विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार

**नालासोपारा :** नालासोपारा येथे अल्पवयीन मुलीवर शिक्षकाने बलात्कार केल्याची घृणास्पद घटना उघडकीस आली आहे. शहरात राहणाऱ्या सतरा वर्षांची शाळकरी मुलगी एका शिक्षकाकडे २०२० पासून घरी शिकण्यासाठी जात होती. यावेळी तिच्या अज्ञानाचा फायदा घेत तिच्यावरती त्याने अनेक वेळा लैंगिक अत्याचार केला होता. मुलीच्या सोशल मीडिया अकाउंटचा वापर करीत तिच्या मैत्रिणींशी चॅटिंग, तसेच तिचे फोटो अपलोड केले होते. पीडित मुलीने गुरुवारी नालासोपारा पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

CamScanner

लोकमत पा. न. ४



# भाईंदर खाडीतील शोधमोहीम थंडावली

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** श्रद्धाच्या हत्येनंतर आरोपी आफताबने गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्यासाठी श्रद्धाचा मोबाइल व काही पुरावे भाईंदरच्या खाडीत फेकल्याचा दिल्ली पोलिसांना संशय होता. त्यामुळे गुरुवारी संध्याकाळी ७ वाजेपर्यंत शोधमोहीम सुरू होती. दोन बोटी, दोन पाणबुड्यांच्या साहाय्याने दिल्ली पोलिसांनी माणिकपूर पोलिसांच्या मदतीने भाईंदरच्या खाडीत सर्च ऑपरेशन केले होते; पण पोलिसांना काही धागेदोरे मिळाले नसल्याने ही शोधमोहीम थंडावली आहे.

शुक्रवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास श्रद्धाचा वर्गमित्र रजत शर्मा याला चौकशीसाठी माणिकपूरच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या कार्यालयात बोलाविण्यात आले होते. आतापर्यंत श्रद्धा हत्याकांड प्रकरणात १९ जणांचे जबाब नोंदविल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. मागील पाच ते सहा दिवसांपासून या प्रकरणात दिल्ली पोलिसांना काही धागेदोरे मिळाले की नाही, याची वसईकरांत चर्चा सुरू आहे. दिल्ली पोलिस माणिकपूर पोलिसांच्या मदतीने पुन्हा भाईंदर खाडीत पुराव्यासाठी शोधमोहीम घेणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

लोकमत पा. न. ४

# श्रद्धाच्या कॉलेजच्या मित्राची चौकशी

## गुन्हे प्रकटीकरण शाखेने नोंदविला जबाब

लोकमत न्यूज नेटवर्क

**वसई :** वसईतील तरुणी श्रद्धा वालकर हिच्या दिल्लीत झालेल्या निर्घृण हत्येनंतर दररोज वेगवेगळे खुलासे होत असून, दिल्ली आणि माणिकपूर पोलिसांचा तपास सुरूच आहे. दरम्यान, वसईच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेकडून श्रद्धाचा कॉलेजचा मित्र रजत शुक्ला याची शुक्रवारी चौकशी करण्यात आली.

रजत हा श्रद्धाचा कॉलेजमधील मित्र असून, त्याच्या चौकशीतून या प्रकरणाबाबत माहिती मिळू शकते. वसई गुन्हे प्रकटीकरण शाखेने शुक्रवारी रजत याला बोलावून घेऊन त्याची चौकशी केली. दरम्यान, आरोपी आफताब पुनावाला हा श्रद्धा हिला सिगारेटचे चटके देत होता, अशीही माहिती पुढे येत आहे. प्रेमात असलेली आणि 'लिव्ह इन'मध्ये राहणारी व्यक्ती मारहाण आणि सिगारेटचे चटके देत असतानाही श्रद्धा त्याच्याबरोबर का राहत होती, असा प्रश्न यानिमित्ताने व्यक्त होत आहे. मात्र, श्रद्धा ही आफताबच्या प्रेमात आकंठ बुडालेली होती तसेच तिने आपल्या कुटुंबाबरोबरचे संबंध तोडलेले होते. यामुळे ती मारहाण आणि सिगारेटचे चटके सहन करीतच त्याच्याबरोबर राहत होती. ती त्याला सुधारण्याची एक संधी देऊ पाहत होती, असे तिच्या मित्रांकडून सांगण्यात येत आहे.

### सिगारेटचे चटके

श्रद्धाचा कॉलेजमधील मित्र रजत याने एका वृत्तवाहिनीला दिलेल्या माहितीनुसार, श्रद्धाने आपल्या कुटुंबाबरोबर आणि मित्रांबरोबरचे संबंध तोडून टाकले होते. श्रद्धाने २०२१ मध्ये आपल्या मित्रांना मारहाणीचा आणि सिगारेटचे चटके दिलेला एक फोटो शेअर केला होता. त्यात तिच्या पाठीवर सिगारेटचे चटके होते, असे रजतचे म्हणणे आहे. याबाबत अधिक चौकशीसाठी पोलिसांनी त्याचा जबाब नोंदवून घेतला असल्याचे सांगण्यात आले.

लोकमत पा. न. ४

# श्रद्धाच्या दातांचा एक्स-रे ठरणार दुवा

## दंत चिकित्सकांचा नोंदविला जबाब

लोकमत न्यूज नेटवर्क

**वसई :** श्रद्धा वालकर हिच्या निर्घृण हत्येच्या प्रकरणात गेले काही दिवस दिल्ली आणि माणिकपूर पोलिस सातत्याने वेगवेगळ्या अँगलने तपास करीत आहेत. याचाच एक भाग म्हणून श्रद्धाने ज्या दंत चिकित्सक डॉक्टरकडून उपचार करून घेतले होते, त्यांचाही जबाब नोंदविण्यात आला आहे.

दरम्यान, श्रद्धाच्या दातांचा एक्स-रे या प्रकरणात महत्त्वाचा दुवा ठरणार असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. दिल्ली पोलिस आणि माणिकपूर पोलिसांच्या पथकाने गुरुवारी श्रद्धा हिच्यावर उपचार केलेल्या डॉ. ईशान मोटा यांचा जबाब नोंदवून घेतला आहे. श्रद्धा हिने डॉ. मोटा यांच्या क्लिनिकमध्ये अनेकवेळा येऊन रूट कॅनल करून घेतले होते.

२०२१ मध्ये तिने डॉ. मोटा यांच्याकडून आपल्या दातांवर ट्रीटमेंट करून घेतली होती. यासाठी ती जवळपास आठ वेळा त्यांच्या क्लिनिकमध्ये गेली होती. त्यावेळी तिने एक्स-रे आणि इतर बिलांचे पैसे आपल्या क्रेडिट कार्डचा वापर करून दिले होते. याबाबतचा एक्स-रे आणि इतर ट्रीटमेंटचा फायदा चौकशीच्या कामी होणार आहे. दिल्ली पोलिसांना जंगलात आढळलेल्या जबडा हा श्रद्धा हिचाच आहे का, याचा तपास यावरून होऊ शकतो, असे पोलिसांचे म्हणणे आहे.

CamScanner

पुण्य नगरी पु. पा. न. ४

# भवनविरोधात मराठी एकीकरण समितीचे उपोषण

## महापालिकेचे नाव व बोधचिन्हाचा बेकायदा वापर

हिंदी भाषा भवनाच्या कार्यक्रमाची हिंदी भाषेतील निमंत्रण पत्रिका छापून तिचे सर्वत्र वाटप केले जात आहे. ही पत्रिका महापालिकेने तयार केलेली नाही. परंतु या पत्रिकेत महापालिकेचे नाव व महापालिकेच्या बोधचिन्हाचा वापर करण्यात आला आहे. माजी स्विकृत नगरसेवक विक्रम प्रताप सिंग हे या पत्रिकेतील निमंत्रक आहेत. मात्र, बोधचिन्हाचा वापर करण्यासाठी महापालिकेची कोणतीही परवानगी घेतलेली नसल्याचा आरोप मराठी एकीकरण समितीने केला आहे. या प्रकरणी संबंधितांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी समितीचे गोवर्धन देशमुख यांनी पालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

मीरा-भाईंदर क्षेत्रातील मौजे, घोडबंदर येथील सुविधा भूखंडावर महापालिका कविवर्य हरिवंशराय बच्चन हिंदी भाषा भवन उभारणार आहे. महापालिकेने 'कवी हरिवंशराय बच्चन हिंदी भाषा भवना'च्या भूमिपूजनाचा कार्यक्रम जाहीर केला आहे. येत्या रविवारी सकाळी ११ वाजता या भवनाचे भूमिपूजन होणार आहे. हिंदी भाषा भवन उभारण्यासाठी राज्य सरकारने एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या भवनाला मराठी एकीकरण समितीने विरोध केला आहे. मतांच्या राजकारणासाठी हे भवन उभारले जात आहे. या भवनामुळे हिंदी विरुद्ध मराठी असा भाषिक वाद निर्माण होणार आहे. त्यामुळे हे भवन रद्द करण्याची मागणी मराठी एकीकरण समितीने केली आहे. समितीकडून या भवनाविरोधात गेल्या काही दिवसांपासून शहरात स्वाक्षरी मोहीम राबवली जात आहे.

मीरा-भाईंदर शहरातील नागरिकांचा विरोध असताना असे प्रांतिक, भाषक भवन का उभारण्यात येत आहे, इतकी वर्षे शहरात शांतता असताना आता हिंदी विरुद्ध मराठी असे वातावरण महापालिका का निर्माण करत आहे, असे प्रश्न मराठी एकीकरण समितीने उपस्थित केले आहेत. भवनाचा भूमिपूजन कार्यक्रम रद्द करावा, तसेच या भवनाच्या नावातून 'हिंदी भाषा भवन' हा शब्द वगळण्यात यावा आणि त्याचे राज्यासाठी अथवा शहरासाठी योगदान दिलेल्या व्यक्तींच्या नावाने सांस्कृतिक भवन, असे नामकरण करावे, या मागणीसाठी समितीच्या कार्यकर्त्यांनी आयुक्त दिलीप ढोले यांची गुरुवारी भेट घेतली. परंतु त्याचा काही फायदा झाला नाही. त्यामुळे हिंदी भाषा भवनाला विरोध म्हणून अन्नत्याग करून आत्मक्लेष आंदोलन काशिमीरा येथे सुरू केले. या वेळी पोलीस व महापालिका अधिकारी यांनी राजकीय दबावापोटी आंदोलन उधळून लावण्याचा प्रयत्न केला; परंतु समितीने यांच्या विरोधाला न जुमानता हे उपोषण काशिमीरा उड्डाणपुलाखाली सुरूच ठेवले आहे. तसेच हा कार्यक्रम उधळून लावण्यात येईल, अशी माहिती समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख यांनी दिली आहे.

पुण्य नगरी पा. न. २

# वसई न्यायालय परिसरातून आरोपीचे पलायन

**। नालासोपारा :** वसई न्यायालय परिसरातून बँक दरोड्यातील आरोपी व व्यवस्थापक पोलिसांच्या हातून पळाल्याची घटना घडली. या घटनेमुळे खळबळ माजली आहे.

२९ जुलै २०२१ रोजी विरार येथील बँकेवर झालेल्या खून आणि दरोड्यातील आरोपीला ठाणे कारागृहातून वसई न्यायालयात हजर करण्यासाठी आणत असताना शुक्रवारी दुपारी ही घटना घडली. बँकेचा माजी व्यवस्थापक व खुनाच्या दरोड्यातील आरोपी अनिल दुबे हा पोलिसांना चकमा देऊन पोलिसांच्या ताब्यातून फरार झाला.

दुबे हा यापूर्वी विरार येथील आयसीआयसीआय बँकेत व्यवस्थापक होता. ऑगस्ट २०२० मध्ये तेथील काम सोडून तो नायगाव ॲक्सिस बँकेत कामाला होता. कर्ज फेडण्यासाठी त्याने दरोड्याची योजना आखली. विरोध केल्याने त्याने बँक व्यवस्थापक योगिता चौधरी यांची हत्या केली आणि कॅशियरवरही प्राणघातक हल्ला केला होता.

सामना पा. न. ६

## विजेचा झटका

**विरार :** विजेच्या झटक्याने एका कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. मालवणी मालाड येथे राहणारा अलीम हैदर असे मृत कामगाराचे नाव आहे. चिखल डोंगरी रोड येथील स्मार्ट बाजारजवळील रिलायन्स मॉलमध्ये तो काम करत असताना त्याला अचानक विजेचा झटका लागला आणि जागीच मृत्यू झाला.

सामना पा. न. ६

## तरुण जखमी

**वसई :** मशीनवर काम करत असताना कामगाराची बोटे तुटल्याची घटना उघडकीस आली आहे. खैरपाडी येथील अपलाय मॅन्युफॅक्चरर खदानीजवळ हायड्रौलिक स्पेशर मशीन आहे. या मशीनवर कोणताही अनुभव नसताना ऑपरेटर म्हणून गौराईपाडा येथे राहणारा संतोष गुप्ता याला कामावर ठेवले. मशीनवर काम करत असताना अपघात होऊन त्याची तीन बोटे तुटली.

CS CamScanner

पुढारी पा. न. २

# खासगी क्लासच्या शिक्षकाचा विद्यार्थिनीवर अत्याचार

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा** खासगी क्लासला येणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर शिक्षकाने अत्याचार केला. ही धक्कादायक घटना नालासोपारा येथे घडली असून शिक्षक फरार झाला आहे. या प्रकरणी नालासोपारा पोलीस त्याचा कसून शोध घेत आहेत.

नालासोपाऱ्यात खासगी क्लास घेणारा आरोपी सूरज झा (३०) हा नालासोपारा येथे राहतो. आपल्या घरात तो गणित विषयाची खासगी क्लास घेत होता. त्याच्या घरी क्लाससाठी १७ वर्षांची विद्यार्थिनी येत होती. दोन वर्षांपूर्वी घरात कुणी नसताना आरोपी झा याने तिच्यावर अत्याचार करून तिचे अश्लील छायाचित्रे काढली होती.

दरम्यान, संदर छायाचित्रे सोशल मीडियावर प्रसारित करण्याची धमकी देत तिच्या अज्ञानाचा गैरफायदा घेत तो तिच्यावर वारंवार अत्याचार करीत होता. आरोपीने पीडित मुलीच्या इन्स्टाग्रामवरून तिची काही छायाचित्रे प्रसारित केल्यानंतर अत्याचार झाल्याचे उघडकीस आले.

या प्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात सूरज झा याच्या विरोधात बलात्कार, पोक्सो तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सूरज झा हा फरार असून आम्ही त्याच्या शोधासाठी एक पथक नेमले असून त्याचा शोध सुरू आहे, अशी माहिती नालासोपारा पोलीस ठाण्याचे वपोनि विलास सुपे यांनी दिली आहे.

सामना पा. नं. ६

## ठेकेदारांवर गुन्हे

**विरार :** इमारतीचे काम करताना कामगाराचा खाली पडून मृत्यू झाल्याप्रकरणी तीन ठेकेदारांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हरिंदर गौड हा कामगार सीडी गुरुदेव प्रोजेक्ट येथे बिल्डिंगच्या सोळाव्या मजल्यावर आरसीसी बांधकाम करण्यासाठी लाकडी फळ्या घेऊन जिन्यावरून जात असतान उघड्या लिफ्टच्या जागेतून थेट खाली पडून त्याचा मृत्यू झाला. कामगाराला सुरक्षिततेची कोणतीही साधने न पुरवल्याने तीन ठेकेदारांविरोधात अर्नाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सामना पा. न. ६

## गांजा जप्त

**नालासोपारा :** शहरात तीन वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकून पोलिसांनी त्रिकुटाला बेड्या ठोकल्या आहेत. यात दोन महिलांचा समावेश आहे. बंदी असताना गांजाची सर्रास विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली त्यानुसार पोलीस पथकाने आचोळे रोड येथील झरोखा आपर्टमेंट, कारगील रोड परिसरातील दयाशंकर चाळ आणि संतोष भुवनजवळील अवधूत वेल्फेअर सोसायटीत सापळा रचला. यात एकूण ४५ हजार ८८० रुपयांचा गांजा जप्त केला.

पुढारी पा. न. ६

# भारत जोडो यात्रेत बॉम्बस्फोटाची धमकी देणाऱ्यास अटक

## उज्जैनमध्ये बेड्या; राहुल गांधी यांची हत्या करण्याची दिली होती धमकी

**इंदूर : वृत्तसंस्था**

राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा मध्य प्रदेशात येण्याआधी एका पत्राच्या माध्यमातून इंदूरमध्ये या यात्रेत बॉम्बस्फोट घडवून राहुल गांधी यांची हत्या करण्याची धमकी देणाऱ्या इसमाला अखेर अटक करण्यात आली आहे. नरेंद्र सिंह असे या व्यक्तीचे नाव असून, त्याला उज्जैन पोलिसांनी अटक करून इंदूर पोलिसांच्या हवाली केले आहे.

राहुल गांधी यांची पदयात्रा महाराष्ट्रात शेवटच्या टप्प्यात असताना इंदूरमध्ये एका मिठाईच्या दुकानात एक पत्र सापडले होते. त्यात या यात्रेच्या दरम्यान इंदूरमध्ये बॉम्बस्फोट घडवून राहुल गांधी यांची हत्या करण्याची धमकी देण्यात आली होती. यामुळे एकच खळबळ उडाली होती. राहुल गांधी यांच्या यात्रेचा खालसा स्टेडियमवर मुक्काम ठेवण्यावरून



शीख समाजाकडून झालेला विरोध व पाठोपाठ ही धमकी, यामुळे पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले.

पोलिसांनी २०० सीसीटीव्हींचे फुटेज तपासले, डझनभर हॉटेल व लॉजेसची झडती घेतली तसेच रेल्वेस्थानकांवरही झाडाझडती घेण्यात आली. फुटेजच्या आधारे संशयितांची यादी तयार करण्यात आली. छायाचित्रे जारी करण्यात आली. अखेर उज्जैन शहरात नरेंद्र सिंह ऊर्फ दया ऊर्फ प्यारे याला अटक करण्यात आली. तो मूळचा उत्तर प्रदेशातील रायबरेलीचा रहिवासी असून, या आधीही काही राजकीय नेत्यांना धमकीची पत्रे लिहिली होती. इंदूरमध्ये नुकत्याच झालेल्या काँग्रेसच्या एका सभेलाही तो हजर होता, असे तपासात समोर आले आहे. उज्जैन पोलिसांनी त्याला इंदूर पोलिसांच्या हवाली केले आहे.

CamScanner

पुढारी पा. न. २

# महिलांनी काही नाही घातले तरी छानच दिसतात

## रामदेव बाबांचे वादग्रस्त वक्तव्य

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

महिला साडी नेसल्यावर, सलवार कुर्त्यावरही अमृता फडणवीस यांच्याप्रमाणे चांगल्या दिसता आणि माझ्या नजरेने काही नाही घातले तरी छानच दिसतात, असे वादग्रस्त वक्तव्य योगगुरू बाबा रामदेव यांनी शुक्रवारी ठाण्यातील एका कार्यक्रमात केले. या वक्तव्याचे राज्यभरात तीव्र पडसाद उमटत आहेत.

पतंजली योगपीठ आणि मुंबई महिला पतंजली योग समितीतर्फे ठाण्यातील हायलँड मैदानात योग विज्ञान शिबीर आणि महिला संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस उपस्थित होत्या. त्यावेळी बाबा रामदेव यांनी हे वादग्रस्त वक्तव्य केले. या कार्यक्रमात महिलांनी योगासाठी ड्रेस आणले होते तर महिला महासंमेलानासाठी महिलांनी साड्याही आणल्या होत्या. मात्र सकाळी योग विज्ञान शिबीर झाले. त्यानंतर महिलांचा योग प्रशिक्षण उपक्रम पार पडला आणि लगेच महिलांसाठी महासंमेलन सुरू झाल्याने अनेक महिलांना साड्या नेसायला वेळच मिळाला नाही. त्यामुळे महिला ड्रेसवरच होत्या. ते पाहून बाबा रामदेव म्हणाले, साड्या नेसायला नाही मिळाल्या काही समस्या नाही, आता घरी जाऊन साड्या नेसा. महिला साड्या नेसून पण चांगल्या दिसतात, महिला ड्रेस (सलवार सूट) मध्येसुद्धा अमृता फडणवीस यांच्या सारख्या सुंदर दिसतात आणि माझ्या नजरेने काही नाही घातले तरी चांगल्या दिसतात. मी तर लोक लाजेखातर कपडे घालतो, असे बोलून रामदेव बाबा यांनी योगशक्तीने भारताला विश्वात महान शक्ती बनविण्यासाठी अभियान राबविण्याचे आवाहन केले.




### अमृता फडणवीस १०० वर्षे म्हाताऱ्या होणार नाहीत

या कार्यक्रमात अमृता फडणवीसांची बाबा रामदेव यांनी खूप स्तुती केली. ते म्हणाले, अमृता फडणवीस यांना तरुण राहण्याची एवढी आवड आहे की मला असे वाटते. अमृता फडणवीस १०० वर्ष म्हाताऱ्या होणार नाहीत. कारण त्या हिशोबात अन्न ग्रहण करतात. खूश राहतात, जेव्हा बघावं लहान मुलांसारखे हसत असतात. जसे स्मित हास्य अमृता फडणवीस यांच्या चेहऱ्यावर आहे, तसाच स्मित हास्य मला सगळ्यांच्या चेहऱ्यावर बघायचं आहे.

### राज्यपालांना मराठी भाषेचे प्रेम :अमृता फडणवीस

छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्याने राज्यपाल भगतसिंग कोश्यारी वादात सापडले आहेत. त्यावर पत्रकारांशी बोलताना अमृता फडणवीस म्हणाल्या, मी राज्यपालांना चांगली ओळखते. ते एकमेव असे राज्यपाल आहेत की ते इथे येऊन मराठी शिकले आहेत, ते बोलता बोलता काही तरी वेगळेही बोलून जातात आणि लोक काही वेगळे समजतात, मात्र ते मराठीवर खूप प्रेम करतात.

श्रद्धाला न्याय मिळण्यासाठी या प्रकरणांची खलवर चौकशी होऊन आरोपीला अशी शिक्षा मिळावी की, पुढे कुणी महिलांवर हात ही उगारण्याची हिंमत करणार नाही.

CamScanner

पुढारी पु. पा. नं. २

# मिरा-भाईंदरमध्ये ड्रोन उडवण्यास बंदी

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात ड्रोन, पॅरा ग्लिडर्स , रिमोट कॅंट्रोल मायक्रो लाईट एअरक्राफ्ट यामुळे मानवी जिवीतास आरोग्यास, संरक्षणास बाधा निर्माण करण्याची तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याची शक्यता आहे त्यामुळे ड्रोन, पॅरा ग्लिडर्स , रिमोट कॅंट्रोल मायक्रो लाईट एअरक्राफ्टचा वापर करण्यास मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून मनाई आदेश करण्यात आले आहेत, अशी माहिती प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) यांनी दिली आहे.हे मनाई आदेश पोलिसांकडून करण्यात येणाऱ्या हवाई सर्वेक्षणास व पोलीस आयुक्त यांचेकडुन विशेष



परवानगीने करण्यात येणाऱ्या वापरास लागू राहणार नाहीत.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात दहशतवादी व समाज विघातक कृत्य करणाऱ्या घटकांकडुन ड्रोन, पॅरा ग्लिडर्स , रिमोट कॅंट्रोल मायक्रो लाईट एअरक्राफ्टच्या सहाय्याने हल्ला करुन मानवी जिवीतास आरोग्यास, संरक्षणास बाधा निर्माण करण्याची तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याची शक्यता नाकारता येत नाही. पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील धर्मस्थळे व संवेदनशिल व संरक्षित ठिकाणांचे दहशतवादी व समाज विघातक कृत्य करणाऱ्या कडुन निरीक्षण व रेकी करुन घातपाती कारवाई करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे व संरक्षणाच्या अनुषंगाने ड्रोन, पॅरा ग्लिडर्स , रिमोट कॅंट्रोल मायक्रो लाईट एअरक्राफ्टच्या वापरावर नियमन व नियंत्रण करण्यासाठी प्रतिबंधकात्मक निर्बंध घालणे गरजेचे आहे. त्यामुळे मनाई आदेश लागू करण्यात आले आहेत. हे आदेश २३ नोव्हेंबरपासून २० जानेवारी २०२३ रोजीपर्यंत लागू राहतील, असे पोलीस उपायुक्त, प्रकाश गायकवाड यांनी सांगितले आहे.

पुढारी पु. पा. नं. ३

# दारू घ्या आणि कुठल्याही हॉटेलात बसा

## राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुर्लक्ष

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा भाईंदर शहरात अनेक हॉटेल, चायनीज वाल्याकडे , बिअर शॉप मध्ये परवानगी नसताना दारू पित असल्याचे दिसून येते. याकडे राज्य उत्पादन शुल्क विभाग दुर्लक्ष करत असल्यामुळे वाईन्स शॉप , बियर शॉप मधून दारू विकत घ्या व कोणत्याही हॉटेलमध्ये, रस्त्यावरून बसून प्या अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेकवेळा पोलिसांकडून या मद्यपींवर कारवाई केली जाते परंतु राज्य उत्पादन विभाग कारवाई करत नसल्याने या प्रकारात वाढ होत असल्याचे सांगितले जाते.

मिरा-भाईंदर शहरात अनेक ठिकाणी मद्यपी उघड्यावर दारू पित असल्याचे दिसून येते. तसेच हॉटेलमध्ये , चायनीज स्टॉलवर परवानगी नसताना



दारू पित असल्याचे पोलिसांना आढळून आले आहे. नवघर पोलीस ठाणे हद्दीत पोलीस मध्यरात्री गस्त घालत असताना इंद्रलोक चौकीच्या बाजुला सीजलींग साईड चायनीज रेस्टॉरंट चालु असल्याचे दिसून आले. त्यावेळी पोलिसांनी हॉटेलमध्ये जाऊन तपासणी केली असता काही व्यक्ती हॉटेलमध्ये दारू पित बसले होते.त्यावेळी हॉटेल मालकाला हॉटेलमध्ये दारू पिण्याचा परवाना आहे का असे विचारले असता त्याने परवाना नाही असे सांगितले. हॉटेल मालकाचे अक्षय साईनाथ ठाकुर असे नाव असून त्याच्याकडे कोणत्याही प्रकारचा हॉटेलमध्ये दारू पिण्याचा परवाना नसताना ग्राहकांना चायनीज रेस्टॉरंटमध्ये दारू पिण्यास परवानगी दिली. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने अशा अवैध दारू विक्री, हॉटेलमध्ये परवाना नसताना दारू पिणाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी सामाजिक संस्थाकडून करण्यात येत आहे. काशिमिरा येथे जरीमरी मंदिराच्या बाजूला असलेल्या वाईन्स शॉपच्या बाजूला बिनधास्तपणे रस्त्यावर दारू पित असल्याच्या अनेक तक्रारी आहेत त्या वाईन्स शॉपवर देखील कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

CamScanner

लोकसत्ता पा. न. १८

# कायदेशीर भाडे १५ रुपये; वसुली २० रुपयांची

## परिवहन विभागाचा आदेश रिक्षाचालकांकडून धाब्यावर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने रिक्षाचे किमान शेअरिंग भाडे १५ रुपये निश्चित केले असताना वसई-विरार शहरात रिक्षाचालकांची मनमानी सुरू आहे. यावरून प्रवासी आणि रिक्षाचालक यांच्यात शाब्दिक चकमकी सुरू आहेत.

दोन वर्षांपूर्वी रिक्षाचालकांनी केलेली भाडेवाढ बेकायदा आहे, असा प्रवाशांचा आरोप आहे. किमान भाड्यात रिक्षाचालकांनी दुपटीने वाढ केली आहे. याविरोधात प्रवाशांनी अनेकदा आंदोलनेही केली आहेत. मात्र, रिक्षाचालक भाडेवाढीवरून मागे हटण्यास तयार नव्हते. त्यामुळे रिक्षाचालक आणि प्रवाशांमधील संघर्ष विकोपाला गेला होता. यावर परिवहन विभागाने मध्यस्थी केली. त्यानंतर तीन प्रवासी आणि किमान भाडे १५ रुपये केले.

> भाडेवाढ रद्द झाली पाहिजे. ही आर्थिक पिळवणूक आहेच, शिवाय भाडे न दिल्यास रिक्षाचालक वाद घालतात.
>
> – **मनीष पाटील**, प्रवासी, विरार



> १५ रुपये भाडे आकारण्याचा आदेश असूनही भाडे कमी करण्यात आलेली नाही.
>
> – **बाबासाहेब ओव्हाळ**, प्रवासी

किमान भाडे आकरणी १५ रुपये ठेवण्याचा आदेश परिवहन विभागाने दिला होता. त्यानुसार काही रिक्षा संघटनांनी भाडे घेण्यास सुरुवात केली होती. मात्र, इंधन दरवाढीचे कारण देत सध्या काही रिक्षाचालकांनी दुप्पट भाडे घेण्यास सुरुवात केली आहे.

भाड्यासाठी तक्रार करणाऱ्या प्रवाशांना मारहाण केल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत.

शहरात रिक्षाचालक चार ते पाच प्रवासी बसवतात. त्यांच्याकडून २० रुपये प्रति प्रवासी भाडे आकारले जात आहे. याविरोधात प्रवाशांचा आवाज दडपला जात आहे. शिवाय परिवहन विभागाकडूनही कारवाई केली जात नसल्याचा आरोप काही प्रवाशांनी केला आहे.

प्रवाशांनी रिक्षाचालकांवर कारवाईसाठी पोलिसांकडे तक्रारी केल्या आहेत. रिक्षा भाडेवाढीवर मागील दोन वर्षांत वसई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने कोणताही तोडगा काढलेला नाही. केवळ बैठकांमधून आश्वासने दिली जात असल्याचे काही प्रवाशांनी सांगितले.

लोकसत्ता पा. न. १८

# ३५ हजार चौरस फुटांचे बेकायदा बांधकाम पालिकेकडून जमीनदोस्त

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** शहरातील अनधिकृत बांधकामांवरील कारवाईला वेग आला आहे. प्रभाग समिती 'एफ' आणि 'सी' मधील ३५ हजार चौरस फुटांचे अनधिकृत बांधकाम पालिकेने जमीनदोस्त केले.

कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता अनधिकृत बांधकामे उभारली जात आहेत. वसई विरारच्या पूर्वेकडील भागात अनधिकृत बांधकामांची संख्या अधिक आहे. पालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाईची मोहीम सुरू केली आहे.



गुरुवारी 'एच' प्रभागातील पेल्हार धरणाजवळ उभारलेल्या अनधिकृत इमारतीवर कारवाई करीत १४ हजार चौरस फुटांचे बांधकाम तोडण्यात आले. तर पेल्हार येथील २ इमारतींचे १३ हजार चौरस फूट आणि वाकणपाडा येथे २,१०० चौरस फुटांचे गाळ्याचे अनधिकृत बांधकाम व २५० चौ. फुटांच्या दोन अनधिकृत गाळ्यांचे बांधकाम तोडण्यात आले.

प्रभाग समिती 'सी'मधील चाळींसाठी उभारलेल्या ५ हजार चौरस फुटांच्या जोत्याचे बांधकाम यंत्राच्या साहाय्याने जमीनदोस्त करण्यात आल्याची माहिती पालिका उपायुक्त अजित मुठे यांनी दिली.

CamScanner

लोकसत्ता पा.नं. १६



# दीड हजार किलो प्लास्टिक जप्त

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** वसई विरार महापालिकेने प्लास्टिकविरोधी कारवाई अधिक तीव्र केली आहे. बुधवारी पालिकेने प्रभाग समिती 'डी' आणि 'एच'मध्ये धाड टाकत दीड हजार किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

शासनाने १ जुलैपासून एकल प्लास्टिक वापरावर बंदी घातली आहे. त्यानंतर पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने जनजागृती करून प्लास्टिकचा वापर करू नये, असे आवाहनही नागरिकांना केले होते. मात्र तरीही विविध ठिकाणच्या भागात मोठ्या प्रमाणात एकल प्लास्टिकचा वापर सुरूच आहे. भाजीविक्रेते, फळविक्रेते, दुकानदार, फेरीवाले अशा ठिकाणी प्लास्टिक पिशव्यांचा वापर सुरू आहे. याशिवाय प्लास्टिक वापरामुळे कचऱ्यातही प्लास्टिकचे प्रमाण वाढले आहे. त्याला आवर घालण्यासाठी पालिकेने कारवाई सुरू केली आहे. बुधवारी प्रभाग समिती 'डी' व 'एच'मधील औद्योगिक वसाहतीत आरोग्य निरीक्षकांमार्फत प्लास्टिक पिशवी जप्त केल्या. मुनबीन को. ऑ. हौ. सोसायटी गाळा नं. ०८ जनार्दन गुप्ता यांच्या दुकानात ५०० किलो प्लास्टिक पिशव्या, तर तिरुपती ट्रेड सेंटर गाळा नं. १ आर्यन टेम्पो सर्व्हिस यांच्याकडे वेगवेगळ्या ठिकाणी पाठविण्यात येणाऱ्या १ हजार किलो प्लास्टिक पिशव्या जप्त करण्यात आल्या. या वेळी दहा हजारांचा दंड वसूल करण्यात आला.

एकल प्लास्टिक वापरावरील कारवाई सुरूच आहे. आता या कारवाईला गती देऊन ही तीव्र करण्यात येत आहे, तशा सूचनाही आरोग्य निरीक्षकांना दिल्या आहेत, असे घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या उपायुक्त डॉ चारुशीला पंडित यांनी सांगितले.

पु.पा.नं.१
महाराष्ट्र टाइम्स

## पदाधिकाऱ्यांची हकालपट्टी

**मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदर जिल्हा भाजप कार्यकारिणीमधील दोन पदाधिकाऱ्यांची प्रदेशाध्यक्षांच्या आदेशानुसार पक्षविरोधी काम केल्याचा ठपका ठेवत पदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. मिरा-भाईंदर शहर भाजपचे जिल्हा सचिव सुनील केसरी आणि गोल्डन नेस्ट विभागाचे मंडल अध्यक्ष ब्रिजेश सिंग या दोघांना पदावरून कार्यमुक्त करण्यात येत असल्याचे जिल्हाध्यक्ष रवी व्यास यांनी पत्राद्वारे नुकतेच कळवले आहे. समाजमाध्यमांवर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांविरोधात वक्तव्य करणे, अपशब्द वापरणे व पक्षादेशाचे पालन न करणे याबद्दल ही कारवाई करण्यात आली आहे. दुसरीकडे, हे दोघे भाजपचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्या गटात सहभागी झाले आहेत.

लोकसत्ता पा.नं.१६

# 'बायोमेट्रीक' नसल्यामुळे कामचुकारपणात वाढ

## सरकारी कार्यालयांत कामांचा खोळंबा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई, विरार शहरातील शासकीय कार्यालयांमध्ये कर्मचाऱ्यांसाठी बायोमेट्रीक यंत्रणा नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये कामचुकारपणा वाढल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. अनेक कार्यालयांमध्ये कर्मचारीच नसल्याने नागरिकांची कामे खोळंबली आहेत.

वसई, विरार शहरात विविध शासकीय कार्यालये आहेत. त्यात तहसीलदार, प्रांत कार्यालय, भूमीअभिलेख, दुय्यम निबंधक, सार्वजनिक बांधकाम, उत्पादनशुल्क विभाग आदी विविध कार्यालयांचा समावेश आहे. या कार्यालयांचा नागरिकांचा नियमित संबंध येत असतो. मात्र अनेकदा कार्यालयात कर्मचारी गैरहजर असतात, तसेच ते उशिरा येतात आणि लवकर निघून जात असतात. यामुळे नागरिकांची कामे होत नाहीत. कार्यालयात कर्मचाऱ्यांच्या हजेरीसाठी बायोमेट्रीक यंत्रणा नसल्याने हे कर्मचारी कामचुकारपणा करतात. त्यासाठी शासकीय कार्यालयात बायोमेट्रीक यंत्रणा बसवावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते नितीन म्हात्रे यांनी केली आहे.

CS CamScanner

महाराष्ट्र टाइम्स पु. पा. नं. १

# रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्यांवर बडगा

म. टा. वृत्तसेवा, वसई

वसईमधील अनेक रस्त्यांवर गॅरेज आणि चारचाकी वाहनांच्या दुकानदारांनी वाहने पार्क करून रस्त्यांवर अतिक्रमण केले आहे. यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्यातच या ठिकाणी असलेले बस थांबेदेखील गायब झाले आहेत. याबाबत 'महाराष्ट्र टाइम्स'ने वृत्त प्रकाशित केल्यानंतर, वाहतूक विभागाने अशा दुकानदारांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. अशा एकूण १० दुकानदारांवर माणिकपूर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून हे अतिक्रमण हटवण्याची कारवाई करण्यात येणार आहे.




वसईत मुख्यतः अंबाडी रोड ते पंचवटी नाका या दरम्यानच्या रस्त्यावर दुतर्फा ही वाहने उभी असल्याचे दिसते. या परिसरातील १० दुकानमालकांनी नोटिसा बजावल्यानंतरही, रस्त्यावरील गाड्या न हटवल्याने, त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. माणिकपूर पोलिस ठाण्यात वाहतूक पोलिसांनी दिलेल्या फिर्यादीनंतर ही कारवाई करण्यात आली. यानंतर येथील अतिक्रमणे हटवण्याची कारवाई होणार असल्याचे वसई वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक सागर इंगोले यांनी सांगितले. दुकानांच्या अतिक्रमणावर कारवाईचे सत्र यापुढेही असेच सुरू राहणार असल्याचे इंगोले यांनी सांगितले.